# प्रेसनोट

दि.२३/०२/२०२०

## जिल्हा विशेष लेखा परीक्षक, (सहकारी संस्था) पुणे, कार्यालयातील लेखा परीक्षकावर लाच स्विकारले प्रकरणी कारवाई

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
| गुन्हा नोंद क्रमांक | हडपसर पोलीस स्टेशन, पुणे शहर गु.र.नं. २६९/२०२० |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम – ७, |
| आरोपीचे नाव व कार्यालय | १) लोकसेवक - भगवंत नारायण बिडगर, वय - ५६ वर्षे, लेखा परीक्षक, श्रेणी - १ (वर्ग -३) जिल्हा विशेष लेखा परीक्षक, सहकारी संस्था कार्यालय पुणे. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ३,७५,०००/- |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | ५०,०००/- |
| थोडक्यात माहिती. | पडताळणी दिनांक :- २२/०२/२०२०<br>सापळा दिनांक :- २२/०२/२०२०<br>यातील तक्रारदार हे प्रमाणित लेखा परीक्षक (खाजगी) असून संस्थेच्या नेमणुकीनुसार त्यांनी त्या सहकारी पतसंस्थेचे ऑडीट केले होते.<br>आरोपी लोकसेवक यानी त्या ऑडीटमध्ये त्रुटी काढून त्यामध्ये तक्रारदार यांचेवर फौजदारी कारवाई न करण्यासाठी लाचेची मागणी करून यापुर्वीच ३,००,०००/- (तीन लाख रूपये) स्वीकारलेबाबत तक्रार दाखल केली. उर्वरीत ७५ हजाराच्या लाच मागणी पैकी ५०,०००/- हजार रूपयांची लाच मागणी करून ती लाच रक्कम स्वीकारताना रंगेहात पकडण्यात आले.<br>अटक आरोपी लोकसेवकास आज रोजी विशेष न्यायालयात हजर केले असता त्यास गुन्हयाचे तपासकामी दिनांक २५/०२/२०२० रोजीपर्यंत पोलीस कस्टडी रिमांड देण्यात आली आहे. |

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. राजेश बनसोडे व मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. संजय पाटील, यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमुद क्रमांकावर सपर्क साधण्याबाबतचे आवाहन श्री. राजेश बनसोडे, पोलीस उप-आयुक्त/पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे यांनी केले आहे.

१. <u>हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४</u>
२. ॲन्टीकरप्शन ब्युरो, पुणे -
   दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३. व्हॉट्स-ॲप क्रमांक पुणे - ७८७५३३३३३३
४. व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५. ई-मेलआयडी- पुणे **dyspacbpune@mahapolice.gov.in**
६. फेसबुकपेज- **www.facebook.com-maharashtraACB**
७. वेबसाईट- **www.acbmaharashtra.gov.in**

सहायक पोलीस आयुक्त /पोलीस उप अधीक्षक ॲन्टी करप्शन ब्युरो,पुणे

( श्रीहरी पाटील )
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक(प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे युनिट.